आमदार
विधानपरिषद सदस्य

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

# मराठा आरक्षण

## सरकारची इच्छाशक्ती असेल तर, आरक्षण देता येईल पण ....

मराठा आरक्षणाचा प्रश्न येत्या काळात चिघळणार आहे, हे सर्वश्रुत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या मताचा मी आहे, परंतु कुठले आरक्षण ? कसले आरक्षण ? किती आरक्षण ? यांची स्पष्टता होत नसल्यामुळे आज पर्यंत आरक्षणाचा प्रश्न निकाली निघत नाही.हाच कळीचा मुद्दा आहे. बोलणारे, लिहणारे, मागणी करणारे हे केवळ मराठा समाजाला आरक्षण या विषयावर चर्चा करतात, मागणी करतात, परंतु स्पष्ट कुणीच बोलतांना दिसत नाही.म्हणून हा लेख प्रपंच..

मराठा समाजाला आरक्षण दयायचे असल्यास, सर्वप्रथम आपण कायद्याचा आणि साविधानात्मक तरतुदीचा विचार केला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दूरदृष्टीकोन ठेवून मागासघटकांना वेगळे आरक्षण देण्याची तरतूद केली होती. या तरतुदी नुसार राज्याला साविधानात्मक अधिकार बहाल केले आहे.त्यासाठी संविधानाची तरतूद कलम १६(४) काय म्हणते, ते आपण बघुया, कलम १६(४) म्हणते कि "या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये **नागरिकांच्या ज्या** कोणत्याही मागासवर्गाला, राज्याच्या मते, पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही अशा **मागासवर्गाकरिता** नियुक्त्या किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही."

वरील तरतुदी नुसार हे स्पष्ट आहे कि,कुठल्याही मागासवर्गाला योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर,आरक्षणाची तरतूद करता येईल.हे बघण्यासाठी सर्वप्रथम राज्याला,हे बघावे लागेल कि,मराठा समाजाची लोकसंख्या किती आहे, हे बघत असतांना संपूर्ण ओबीसी समाजाची लोकसंख्या किती आहे,हे प्रत्यक्ष मोजणी करून सांगावे लागेल,या ठिकाणी राणे समितीचा अहवाल चालणार नाही,तो आम्ही मान्य करणार नाही,किवा न्यायालय सुद्धा मान्यता देणार नाही.मूळ **कळीचा मुद्दा हाच** आहे,सरकारची इच्छाशक्ती असेल तर,सर्वप्रथम मागासवर्गीयांची,ओबीसी,भटके विमुक्त, धनगर, वंजारी, माळी, तेली, बाराबलुतेदार, अठरापगड जाती या संपूर्ण समाजाची मंडल आयोगाच्या यादी नुसार, जात निहाय जनगणना करणे आवशक आहे,हि जात निहाय जनगणना करणे, सहज शक्य असून केवळ एका महिन्यात,संपूर्णतः जातनिहाय जनगणना, मराठा समाजासह सहज शक्य आहे. विज्ञान युगामध्ये संगणकाची महिमा ऐवढी न्यारी आहे, आणि आधार कार्डशी लिंक करून हे सहज शक्य आहे.प्रश्न सरकारच्या इच्छाशक्तीचा आहे.

वरील प्रमाणे जातनिहाय खरोखरची लोकसंख्या सरकार कडे उपलब्ध झाल्यास,त्या नुसार मग ते ५२% असो कि, ४० % असो कि, ६०% असो जो काही आकडा समोर येईल,त्या नुसार ओबीसींना आणि मराठ्यांना, भटक्या विमुक्तासह वेगवेगळे आरक्षण देता येईल. जर ५०% च्या वर आरक्षण गेल्यास घटना दुरुस्ती करता येईल.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 256010

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

या पूर्वीच्या सरकारांनी स्पष्टपणे निर्णय घेतला होता कि, ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता, वेगळे आरक्षण देण्याची तरतूद केली होती.परंतु या आरक्षणाला जेव्हा मुंबई उच्च न्यायालयात आव्हाहन देण्यात आले, तेव्हा या आरक्षणाला स्थगिती देण्यात आली.आणि आज या आरक्षणाच्या संदर्भात मागासवर्गीय आयोगाकडे चेंडू पाठविण्यात आला आहे. हा चेंडू आता जनता दरबारी पाठविण्यात आला आहे, उद्या हा चेंडू सरकार दरबारी जाईल, नंतर तो न्यायालयात जाईल, आणि न्यायालय विचारेल,संविधानाच्या तरतुदी प्रमाणे,मराठा समाजाला योग्य प्रतिनिधित्व नाही, याचा डाटा सरकारनी गोळा केला आहे काय ?, हा समाज मागास आहे हे सिद्ध झाले आहे काय ?, या समाजाची खरी लोकसंख्या काय आहे, हे प्रत्यक्ष सरकारानी मोजून बघितली आहे काय ? जर याला उत्तर "नाही", असे आले तर सरकारनी कुठलाही निर्णय घेतला तरी, आणि मागासवर्गीय आयोगाने कुठलीही शिफारस केली तरी, मराठा समाजाचा दावा, उच्च न्यायालय किवा सर्वोच्य न्यायालयात टिकणार नाही.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आणि ते प्रत्यक्षात, कायदेशीररित्या त्यास मजबुती देण्यासाठी मी काही सूचना करीत आहे, त्या सूचनेचे तंतोतंत पालन जर, हे सरकार करीत असेल तरच, आपण संविधानाच्या कलम १६(४) नुसार आरक्षण देवू शकतो,असा माझा ठाम विश्वास आहे.त्याचे कारण असे कि, आरक्षणाचा आणि संविधानाच्या एकूणच तरतुदीचा मी गाढा अभ्यासक आहे, गेले २० वर्ष मी, याचा अभ्यास केला आहे, आणि सरकार दरबारी हा विषय मी मांडत आलो आहे. शाहू महाराजांनी आरक्षण देतांना कोणते विचार व्यक्त केले होते, याचा मी चांगला गहन पणे अभ्यास केलेला आहे. मंडल आयोगाच्या शिफारशी सादर करतांना आयोगाचे एक सदस्य एल.आर.नाईक यांनी एक डीसेंट नोट लिहिली होती,त्याचाही मी अभ्यास केला आहे.इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या प्रकरणी सर्वोच्य न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशाच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचा मी अभ्यास केलेला आहे, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, भारतरत्न संविधानाचे रचियेता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाचे १६(४) कलम, संविधान पीठामध्ये मंजूर करून घेतांना आणि त्यावर चर्चा करतांना जे भाषण केले होते, त्याचाही मी अभ्यास केला आहे. सन १९४८ साली खासदार टी.टी.रामकृष्णचारी यांनी या कलमा बद्दल डॉ.भीमराव आंबेडकरांना प्रश्न विचारला होता, मागासवर्गीय म्हणजे काय ? तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी जे उत्तर दिले होते, ते अप्रतिम, दूरदृष्टीने, विद्ववत्ता पूर्वक, आणि आजच्या घडीला, तंतोतंत खरे उतरणारे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते कि, आपण या कलमा नुसार राज्याला आरक्षणाचे अधिकार देत आहो. मागासवर्गीय मधील बारा बलुतेदार, अठरा पगड जाती, परंपरागत व्यवसाय करण्याऱ्या जाती, तसेच वंचित घटक यांना प्रशासनात योग्य सरकारी सेवेत प्रतिनिधित्व मिळाले नसेल, तर आरक्षण करण्यासाठी राज्याला अधिकार देत आहोत,



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१. टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

आपल्या भाषणामध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी एक शंकाही उपस्थित केली होती कि, राज्यकर्त्यांनी आपल्या सद्‌सद विवेक बुद्धीचा, विचार करून निर्णय घ्यावा. आणखी असे कि, बाबासाहेब आंबेडकरांनी असे सुतोवास केले होते कि, या बाबतीत वाद निर्माण होवून, कोर्ट कचेरीत मध्ये हे प्रकरण जाईल, त्यावर सुद्धा सद्‌सद विवेक बुद्धीचा, आणि या कलमाच्या कसोटीवर खरे ठरेल तोच निर्णय घ्यावा.

## सरकारनी हे करणे आवशक आहे.:-

**टप्पा क्र.१ :-** सर्व ओबीसी, भटके विमुक्त, बारा बलुतेदार, विशेष मागास प्रवर्ग तथा कुणबी आणि मराठा यांची जातिगत संगणीकृत, आधारकार्ड लिंक करून,किवा इतर ॲप तयार करून, किवा प्रत्यक्ष जनगणना करून, एका महिन्यात अहवाल मागवावा, मार्ग कुठलाही असो जनगणना करणे आवशक आहे.

**टप्पा क्र.२ :-** राज्य सेवेत असणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांची एकूण संख्या व त्याच प्रमाणे, मराठा अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या यांचा प्रत्यक्ष डाटा जाहीर करावा.

**टप्पा क्र.३ :-** मागासवर्ग आयोगाचा अहवाल त्वरित मिळावा यासाठी शासनाने आयोगास सर्व सुविधासह प्रशासकीय बळ देवून, अद्यावत कार्यालयाची उभारणी करावी.

**टप्पा क्र.४ :-** भटके विमुक्त ओबीसी सह, मराठा समाजाची जात निहाय जनसंख्या उपलब्ध झाल्यानंतर जर ५२% च्या वरहि आकडेवारी गेल्यास, या आकडेवारीच्या ५०% आरक्षण देता येईल. आणि हे देत असतांना, ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता, ते द्यावे लागेल. असे करतांना आवश्यकता भासल्यास,घटना दुरुस्ती करता येईल. कारण केंद्रात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजपचे सरकार आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे, जर केंद्रांनी विधेयक आणले तर, कुठल्याही राजकीय पक्षाची, या आरक्षणाला विरोध करण्याची हिम्मत होणार नाही. प्रश्न राज्य सरकारच्या इच्छाशक्तीचा आहे.

दि.२५/०७/२०१८

**---- हरिभाऊ राठोड**
**विधानपरिषद सदस्य,**



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाझा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१. टेली - 07232-256333, 256010